# वेगळेपण जपतांना

बुधवारी दि. १४ ऑगस्टला संध्याकाळी ६ वाजता घोले रोडच्या पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात 'वेगळेपण जपतांना' कार्यक्रम सुमारे २०० पालक, शिक्षक, प्राचार्य, समुपदेशक यांच्या उपस्थितीत पार पडला. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेतून सावित्रीबाई फुले विद्यापीठांतर्गत चालविल्या जाणाऱ्या एक वर्षाच्या *Education of the gifted* (प्रज्ञावंतांचे शिक्षण) ह्या अभ्यासक्रमातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्या विषयाचे एक आगळे वेगळे सादरीकरण केले.

समाजात असलेली प्रखर बुद्धीमत्तेचे निदर्शक असलेली वेगळे विचार आणि मुल्ये जपणारी मुले-मुली आणि माणसे कशी समजावून घेता येतील हा या कार्यक्रमाचा विषय होता. श्री. समीर अंजली महागावकर संकल्पित, लिखित, आणि दिग्दर्शित अशा या कार्यक्रमात वेगळ्या प्रकारे इतरांमध्ये उठून दिसणाऱ्या मुलं-माणसांच्या छोट्या गोष्टी, त्यांची सतत प्रश्न विचारून माहिती मिळवण्याची ओढ, अती संवेदनशीलता, इतरांपेक्षा जास्त समज असणे, वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची आणि प्रश्न सोडविण्याची क्षमता, अशा कितीतरी वैशिष्ठ्यांची ओळख झाली. हा ठेवा कसा जपला जातो आणि तो किती महत्वाचा आहे ह्याची जाणीव करून देत त्यांनी प्रेक्षकांना बोलते केले. एखाद्या अभ्यास विषयाची इतकी सुंदर, सहज ओळख सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण ह्या प्रयोगातून साध्य झाल असेल याच प्रत्यंतर प्रेक्षकांच्या प्रतिसादातून दिसत होत.

ज्ञान प्रबोधिनीत अशा हुशार मुलांचे शालेय शिक्षण तर चालू असतेच, पण त्याबरोबर इतर शाळेतील मुलांसाठी शनिवार रविवारचे शाळेनंतरचे  शिक्षण, (प्रज्ञाप्रबोध) दिले जाते. तसेच प्रज्ञावंत मुलांच्या पालकांना सक्षम करणारा द्वितीय-वर्षीय आधार-वर्ग, (प्रज्ञामैत्र) घेतला जातो. या सगळ्यासाठी लागणारे शिक्षण वर उल्लेखिलेल्या एक-वर्षीय पदव्युत्तर पदविका वर्गातून दिले जाते. या अभ्यासक्रमाची समाजाभिमुखता जणू यावरून सिद्ध झाली.

डॉ. सुजला वाटवे
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था.

## Safeguarding the uniqueness

*'Vegalepan japatanna'* ('वेगळेपण जपतांना') was organized by Jnana Prabodhini's Institute of Psychology, on Wednesday the 14th August, in Pandit Javaharlal Nehru Cultural Centre, Ghole Road, Pune. Audience consisted of around 200 parents, grandparents, teachers, principals, and counselors. Students passed out from 'Education of the gifted', a one-year diploma course after post-graduation, affiliated to Savitribai Phule Pune Univesrsity, presented a unique performance reflecting the undertaken subject.

Topic of the presentation was how to explore, pinpoint and identify high intelligence through their novel and ethical thoughts. The presentation was conceptualized, written, and directed by Mr. Sameer Anjali Mahagaonkar. The event included diverse stories of children asking continuous mind-boggling questions, showing indefinite curiosity to explore, high sensitivity, having unique and innovative thinking and problem-solving style were reflected through reading of short stories, individual prologues, counseling examples, etc. Being interactive event audience participated through their own experiences, and strategies in handling the 'different' behaviours of these highly able children. The whole event threw light on significance of the early identification and appropriate nurture through creating conducive atmosphere. How this treasure is valuable and how to take care of such treasure was focused throughout the exclusive performance. From the responses of audience it was clearly seen that a study topic can reach general population through such type of unique and different performance.

Jnana Prabodhini conducts many types of activities for children, especially to grow their talents. It is in the form of regular school education, after-school programs for highly intelligent children (Prajna Prabodh), 2-year parent-support program for enriching parents of highly intelligent children (Prajna-Maitra). For conducting all these distinctive programs training is done through the above mentioned One-Year diploma course in Educating the gifted. Social face and reflection in implementation is an important core aspect of the course.

Dr. Sujala Watve

(Secretary, Jnana Prabodhini Samshodhan Sanstha)